वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरुवार दि. २० नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# मुस्लिमांच्या मतांवर मोहीमा जोरात..!
# विकास मात्र बिंदुसरेच्या पुरात हरवला..!
# उठ 'मुसलमाना' जागा हो...!



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## संपादकीय

स्थानिक स्वराज्य संस्था असो वा लोकसभा, विधानसभा-निवडणूक आली की राजकीय पक्षांच्या डोळ्यात अचानक मुस्लिम मतदारांचा 'महत्त्वाचा घटक' म्हणून उदय होतो. दर पाच वर्षांनी मुस्लिम वस्त्यांमध्ये आश्वासनांचा पाऊस होतो, परंतु निवडणूक संपली की तीच आश्वासणं धुळीत मिसळतात, मतांचा वापर होतो पण विकासाचा प्रश्न मात्र 'नंतर पाहू' म्हणून मागे ढकलला जातो तो कायमचच.. हाच विसंगत वास्तव आज बीडच्या मुस्लिम समाजाच्या मनात तीव्र नाराजी निर्माण करीत आहे. याला जबाबदार फक्त तीस वर्ष सत्ता भोगणारे बीडचे क्षीरसागरच नव्हे तर सत्ताधाऱ्याच्या बाकाला बाक लावून बसणारे विरोधी पक्षाचे नेते व मुस्लिम समाजाच्या नेत्यांसोबत तुम्ही आम्ही सुद्धा जबाबदार आहोत.

मुस्लिम वस्त्यांमधील रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, शाळा, आरोग्य सेवा, रोजगारप्रश्न-हे प्रश्न आजही पूर्वीच्याच अवस्थेत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर नेत्यांची गाडी या भागांत फिरते, फोटो काढले जातात, बैठका घेतल्या जातात पण प्रत्यक्ष काम मात्र शून्य. मत मागताना तुमचा विकास आम्ही करू म्हणणारे, नंतर विकासाच्या कामावर येताना गायबच होतात.पावसाळा आला की बिंदुसरेच्या पाण्यात मुस्लिम समाजाच्या संसारासोबत स्वप्न ही वाहून जातात. मग नेता येतो, फोटो काढतो अन् त्याच फोटोच्या जीवावर निवडणुकाही जिंकतो.

पक्ष कुठलाही असो त्याच्या राजकीय गणितात मुस्लिम मतदार फक्त मतांची टक्केवारी वाढवण्यासाठी वापरले जातात. निवडणुकीच्या वेळी , जामा मशिदींमध्ये भेटी, शहेनशहा वली दर्ग्यावर चादरी, इफ्तार पार्ट्यांची धांदळ, बड्या कब्रस्तानात गर्दी तर समाजाच्या कार्यक्रमात उपस्थितीत नेता व त्याचे कार्यकर्ते पहायला मिळतात. निवडणुका संपल्या की गर्दी आपोआप ओसरली जाते.मुस्लिमांच्या वस्त्यात आश्वासनांच्या ढिगाऱ्यांचा वर्षाव होतो. वेळ सरून जाते माणसं मात्र जुन्याला जुनी राहतात.परंतु त्याच समाजाला भेट देताना तेच चेहरे नंतर क्वचितच दिसतात.

बीडच्या मुस्लिम समाजाने आता मोठ्या संख्येने मतदान करण्याबरोबरच हिशोबी मतदान करणे ही महत्त्वाचे आहे.निवडणुका येत राहतील, जात राहतील. परंतु मुस्लिम समाजाला प्रत्येक निवडणुकीत फक्त आश्वासनांचे गोडवे आणि राजकीय वापराचा अनुभव येत राहिला तर ही परिस्थिती पुढे अधिक गंभीर होईल. हे मुस्लिम समाजाने नेत्याच्या रुपात दडलेल्या ठगांना सांगीतलं पाहिजे. मतांची ताकद आहे पण तिचा वापर जागरूकपणे करणेही अत्यंत गरजेच आहे.



**सत्यवेध**
मोहम्मद अबुबकर खमरपाशा
(संपादक दै.दिव्य वार्ता)

## मुस्लिम समाजाने पैशाच्या अमिषाला बळी पडू नये...

निवडणुकीचा काळ जवळ आला की काहींना मतदारांच्या डोळ्यांत धूळफेक करायची संधी मिळते. पैशांची खैरात, तात्पुरता लाभ, आणि क्षणिक सुख दाखवून मतांची खरेदी करण्याचा प्रयत्न केला जातो. निवडणुकांच्या काळात राजकीय नेते येतात, पैशांचे लोभ दाखवतात, हातात काही हजार रुपये देतात आणि निघून जाता. पण त्यानंतर पाच वर्षे त्यांचा पत्ता लागत नाही. मत द्यायचा अधिकार हा अल्लाहची नियमत आहे. कुराणातही वारंवार न्याय, प्रामाणिकता आणि सद्वर्तन यावर भर दिला आहे. समाजाच्या भल्यासाठी निर्णय घेणे ही जबाबदारी आहे. मुस्लिम समाजाने आता पैशाच्या अमिषाला बळी न पडता, आपले मत विचारपूर्वक वापरायला हवे. आपण मत देताना समाजाचा वर्तमान नाही, तर पुढची पिढी ठरवतो.

**बीडच्या मुस्लिम समाजाचे विकासाच्या दृष्टीने प्रचंड नुकसान जर कोणी केलं असेल त्यात क्षीरसागर परिवार येतो. गेली ३५ वर्ष सत्ता भोगणाऱ्या क्षीरसागर परीवाराने मुस्लिम समाजाच्या मताचा वापर करून निव्वळ समाजाला विकासाच्या नावावर झुलवत ठेवण्याचं काम केलं आहे.बीडच्या राजकारणात मुस्लिम समाज हा मतदानाच्या रुपात अव्वल स्थानी येतो. लोकसभा , विधानसभा, किंवा स्थानिक स्वराज्य संस्था असेल कुठल्याही निवडणुकीत मुस्लिम समाजाने क्षीरसागर कुटुंबांना सत्तेच्या खुर्चीपर्यंत पोहोचवण्यासाठी जिवाचं रान जरी केलं असलं तरी मुस्लिमसमाज विकासाच्या नावाला मुकलेला आहे.**





## एमआयएमच्या प्रचार रॅलीने विरोधकांचे धाबे दणाणले

बीड : शहरात आज एमआयएमचे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक यांच्या नेतृत्वाखाली एमआयएम पक्षाचे सर्व अधिकृत उमेदवार आणि पक्षाचे कार्यकर्त्यांच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रसिध्द दर्गा हजरत शहेंशाहवली येथून या रॅलीला सुरूवात करण्यात आली. शहरभर या रॅलीचे स्वागत मतदारांनी केले. आजच्या या रॅलीमुळे विरोधकांचे मात्र धाबे दणाणले. या रॅलीच धसका विरोधकांनी घेतला. मागच्या निवडणुकीत एमआयएम पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला तब्बल २० हजार मते मिळाली होती. अवघ्या काही मतांनी उमेदवाराचा पराभव झाला होता आणि पक्षाचे तब्बल ९ नगरसेवक निवडून आले होते. आता काय निकाला येतो याकडे शहरवासियांचे लक्ष लागून आहे.

## प्रभाग क्रं. १६ मध्ये प्रत्येक मतदारांनी ठरविले हाताचा पंजा मजबुत करायचा

### अक्रम बागवान यांच्या आजच्या रॅलीने प्रभागात काँग्रेसमय वातावरण



बीड, (दिव्य न्युज):- प्रभाग क्रं. १६ मध्ये नगरसेवक म्हणुन राहिलेले अक्रम बागवान हे होत असलेल्या निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिकृत उमेदवार आहेत. हाताचा पंजा हा त्यांचे चिन्ह असून अक्रम बागवान यांनी आज संपूर्ण प्रभागात डोअर टू डोअर फेरी काढून मतदारांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे. आज प्रभागात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये एका रॅलीचे आयोजन बशीरगंज चौकापासून करण्यात आले. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ही उपस्थिती पाहून अक्रम बागवान यांचा विजय निश्चित असल्याचे चित्र प्रभागात दिसून येत आहे.

नगरसेवक असतांना अत्यंत दर्जेदार कामे त्यांनी केले आहेत. सिमेंट रस्ता, सिमेंट नाली, पाईपलाईन, नवीन बोअर, स्वच्छता याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले होते. अक्रम बागवान हे मागील दहा वर्षापासून नगरसेवक असून आता ही त्यांची टर्म आहे. अक्रम बागवान हे हॅट्रीक करणार हे आजच्या रॅलीच्या आयोजनातून दिसून आलेले आहे. प्रत्येक मतदारांपर्यंत अक्रम बागवान यांनी पोहचून हाताचा पंजा या चिन्हासमोरील बटण दाबून विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. आज सकाळी ११ वाजता बशीरगंज चौक मधून काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली बशीरगंज, आसेफ नगर, शहिंशाह नगर, आक्सा मस्जिद चौक, गणेश नगर, रिपोटर भवन समोरून जात या रॅलीने प्रत्येक मतदारांच्या गाठीभेटी घेवून काँग्रेसच हात मजुबत करण्याचे आवाहन केले आहे. अक्रम बागवान हे हॅट्रीक करणार हे प्रभागातील मतदारांनी ठरविलेले आहे.

## जलील लालांच्या तुतारीचा आवाज प्रभागात वाढला

### प्रभाग क्रं.६ मधून जलील लाला सहाव्यांदा नगरसेवक होणार





बीड, (दिव्य न्युज):- मागील दोन दिवसापासून नगर पालिका निवडणुकीकरीता हळुहळू प्रचाराने जोर धरला आहे. प्रभाग क्रं ६ हा अत्यंत प्रतिष्ठेचा असून या प्रभागातून आ.संदीप क्षीरसागर यांचे खंदे समर्थक जलील लाला निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मागील सहा वेळेस ते याच प्रभागातून नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. नगर पालिकेत ते अनेक विषयाचे सभापती राहिलेले आहेत. जलील हे स्वच्छता सभापती असतांना बीड शहरात स्वच्छतेचा प्रश्न निकाली लागला होता. पहाटे ५ वाजल्यापासून उठून ते पूर्ण शहरभर स्वच्छतेची कामे बघत होते. ज्या ठिकाणी जास्त कचरा आहे, स्वच्छता नाही त्या ठिकाणी तात्काळ स्वच्छता कर्मचाऱ्यांना बोलावून स्वच्छता करून घ्यायचे. जलील लाला यांनी प्रभागात अत्यंत दर्जेदार कामे केली असून

▶▶ पान २ वर



## संकल्प विकासाचा निर्धार जनसेवेचा!

### प्रभाग १७ च्या मतदारांचा महेश धांडेंना वाढता पाठिंबा

बीड , (दिव्य न्युज):- बीड नगरपालिका निवडणुकीची तापलेली रणधुमाळी आता चुरशीला आली असून प्रभाग क्रमांक १७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार महेश धांडे यांच्या प्रचाराला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. घड्याळ चिन्हावर लढणारे महेश धांडे हे मूळचे चळवळीतील सामाजिक

▶▶ पान २ वर

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची प्रक्रिया तुम्ही पुढे का ढकलत नाहीत?

## ओबीसी आरक्षणाचा मुद्दा : सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल; पुढील सुनावणी मंगळवारी, तोवर जि. प. निवडणुकांची घोषणा लांबणीवर? राजकीय पक्षांचे लक्ष निर्णयाकडे

**नवी दिल्ली/मुंबई :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाबाबतचा वाद निकाली लागेपर्यंत नामांकन प्रक्रिया पुढे ढकलण्याचा विचार का करत नाहीत, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारला केली. न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्ज्वल भुयान आणि एन. कोटिस्वर सिंग यांच्या खंडपीठाने यासंबंधी पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला ठेवली आहे. यामुळे ही सुनावणी होईपर्यंत राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या निवडणुकांच्या घोषणा होणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.

याप्रकरणी राहुल रमेश वाघ आणि किसनराव गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर बुधवारी सुनावणी झाली. त्यावेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ओबीसी आरक्षणाशी संबंधित अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ मागितल्यानंतर 'आम्ही या मुद्द्यावर विचार करेपर्यंत तुम्ही नामांकन प्रक्रिया पुढे ढकलण्याचा विचार का करू शकत नाही?' असा सवाल खंडपीठाने केला. आरक्षणास विरोध करणाऱ्या पक्षांच्या वकिलांनी निवडणूक प्रक्रिया सुरू राहिल्यास ती मागे घेता येणार नाही, असे निदर्शनास आणले.



### निवडणूक आयोगाला निर्णयाची प्रतीक्षा

१. मंगळवारच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे राज्य निवडणूक आयोगाचे लक्ष लागले आहे. न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून आरक्षणात सुधारणा करण्याची तयारी आयोगाने ठेवली आहे.

२. **न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही. तसेच या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अजून नेमणूक झालेली नाही. याबाबत महसूल विभागाकडून अहवाल अप्राप्त आहे.**

३. नियुक्त झालेले निवडणूक निर्णय अधिकारी हजर झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर आयोगाकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

### प्रक्रिया स्थगित होण्याची शक्यता

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबरला जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २ डिसेंबरला २४६ नगर परिषदा व ४२ नगर पंचायतींसाठी मतदान होईल.

**मात्र, न्यायालयाने वारंवार दाखवलेल्या नाराजीमुळे नामांकन प्रक्रिया स्थगित होण्याची शक्यता वाढली आहे.**

### आरक्षण मर्यादा ओलांडली अन्...

१७ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देऊ नका, असा इशारा राज्य सरकारला दिला होता. बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालातील २७ टक्के आरक्षणाची शिफारस अद्याप न्यायालयीन विचाराधीन असल्याने, आयोगपूर्व स्थितीनुसारच निवडणुका घ्याव्यात, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते. काही स्थानिक संस्थांत आरक्षण ७० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे दावे करणाऱ्या याचिकांवर न्यायालयाने राज्याला नोटीसही बजावली आहे.

### प्रचार थंडावला, खर्चातही हात आखडता

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असल्याने निकाल येईपर्यंत 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेत रिंगणातील उमेदवारांचा प्रचार थंडावला आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नगरपरिषद व नगरपालिकांमध्ये वाढलेल्या आरक्षणाचा विचार करून निवडणुकीला स्थगिती दिली तर काय? असा प्रश्न उमेदवारांना पडला आहे.. त्यामुळे अनेकांनी खर्चातही हात आखडता घेतला आहे.**



### निवडणुकांत 'ईव्हीएम'चा उपयोग वैध आहे का?

**नागपूर :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम'चा उपयोग करणे वैध आहे का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी राज्य निवडणूक आयोगाला करून यावर गुरुवारी (ता. २०) प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले

# शिवसंग्रामच्या मराठवाडा अध्यक्षपदी अनिल घुमरे

## प्रभारी जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर कोकाटे तर महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी संगीता ठोसर



बीड अ आज जिल्हा शिवसंग्राम ची नगरपालिका निवडणूक आणि आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बैठक पार पडली यात मोठ्या संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते यावेळी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले आणि शिवसंग्रामच्या मराठवाडा अध्यक्षपदी अनिल घुमरे तर प्रभारी जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर कोकाटे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रा. सुभाष जाधव, शहराध्यक्ष सुहास पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सचिन कोटूळे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंडितराव माने, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे आदी. उपस्थित होते.

नगरपालिका निवडणुक जाहीर झाली असून यात शिवसंग्रामने राष्ट्रवादी आणि शिवसेनेसोबत युती केली असून नगरपालिका निवडणुका युती सोबत लढणार असल्याचे जाहीर केले आहे. बीड शहराचा विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शिवसंग्रामने ही युती केल्याचे स्पष्ट केले आहे. यातच आज शिवसंग्रामची शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली यात नगरपालिका बरोबरच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका संदर्भात महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली तसेच संघटन बळकट करण्यासाठी शिवसंग्रामच्या मराठवाडा अध्यक्षपदी अनिल घुमरे ,प्रभारी जिल्हा अध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर कोकाटे तसेच महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी संगीता ठोसर यांची निवड करण्यात आली आहे.

# बीड-अहिल्यानगर महामार्गावर बिबट्याचा पुन्हा बिनधास्त संचार; प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

कडा (बीड), (दिव्य न्युज):- रात्री-अपरात्री प्रवास करताना जीव मुठीत धरा! बीड आणि अहिल्यानगर राज्य महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांसाठी ही धोक्याची घंटा आहे. आष्टी वनपरिक्षेत्र हद्दीत बिबट्यांची संख्या वाढल्यामुळे आता ते शेत आणि लोकवस्तीसह थेट महामार्गावर येत असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या दरम्यान कानिफनाथ घाटात बिबट्या पुन्हा एकदा प्रवाशांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केला असून, हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे!

काही दिवसांपूर्वी १५ ऑक्टोबर रोजी याच घाटात बिबट्याचे दर्शन झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता अवघ्या महिनाभरात १९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी बिबट्या पुन्हा एकदा रस्त्यावर उतरल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे. बिबटे हे निशाचर (रात्री सक्रिय) प्राणी आहेत. डोंगरपट्ट्यात त्यांचा नैसर्गिक अधिवास असला तरी, शिकारीसाठी ते लोकवस्तीकडे धाव घेतात. अनेक शेतकऱ्यांच्या शेळ्या, वासरे आणि श्वानांचा फडशा त्यांनी पाडला आहे. आता रस्त्यावर त्यांचा बिनधास्त संचार सुरू असल्याने प्रवाशांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे.बिबट्यांचा उपद्रव वाढूनही वनविभाग कोणतीच ठोस उपाययोजना करत नसल्याबद्दल समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. परमेश्वर घोडके यांनी थेट सवाल केला आहे, वनविभाग केवळ शेळ्या, वासरे यांचा फडशा पाडल्यावर पंचनामा करून नुकसान भरपाई देते. पण ही नुकसान भरपाई देण्याऐवजी त्या बिबट्याचा बंदोबस्त करायला हवा. आज प्राण्यांचा जीव जातोय, उद्या माणसाचा जीव गेल्यानंतर तुमची मदत काय कामाची? अनेक वेळा मागणी करूनही वनविभागाकडून कसलीच उपाययोजना होत नाहीये. बिबट्यांचा बिनधास्त वावर पाहता, वनविभागाने याची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# लोकसेना संघटना निवडणुकीबाबत लवकरच भूमिका जाहीर करणार-ॲड.इलियास इनामदार

बीड , (दिव्य न्युज):- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली असून बीड नगर परिषदेसाठीही अनेक दावेदार मैदानात उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकसेना संघटना नगर परिषद निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला किंवा पक्षाला पाठिंबा द्यायचा, की तटस्थ राहायचे, याबाबत लवकरच भूमिका जाहीर करणार असल्याची माहिती संघटनेचे प्रमुख ॲड. प्रा. इलियास इनामदार यांनी गुरुवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.



लोकसभा, विधानसभा निवडणूक असो की स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक यात लोकसेना संघटना आपली निर्णायक भूमिका जाहीर करत असते. मात्र संघटनेने आतापर्यंत कोणत्याही पक्षाला अथवा उमेदवाराला थेट पाठिंबा दिलेला नाही. तथापि, काही पक्ष प्रतिनिधी व उमेदवारांनी संघटनेशी संपर्क साधून पाठिंब्याची विनंती केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. इलियास इनामदार म्हणाले की, शहर विकासाला गती देणारे आणि लोकशाही बळकटीसाठी काम करणाऱ्या समविचारी पक्षांना अथवा उमेदवारांना लोकसेना संघटना खुलेपणाने पाठिंबा देईल. त्याचबरोबर अशा उमेदवारांच्या प्रचारातही संघटनेचा सक्रिय सहभाग राहणार आहे. येत्या दोन दिवसात याबाबत भूमिका जाहीर करणार असल्याचे ही इलियास इनामदार यांनी म्हटले आहे.

पान १ वरून

## जलील लालांच्या संकल्प विकासाचा

सिमेंट रस्ता, नाली हे कामे पुर्ण झाली आहेत. प्रत्येक पोलवर लाईट आणि प्रत्येकांच्या नळाला पाणी हे जलील लालाचे काम बोलतेय. प्रभागातील मतदारांचा प्रतिसाद जलील लाला यांना मोठ्या प्रमाणात मिळत आहे. या प्रभागातुन तुतारीचा आवाज जोरदार येणार असून जलील लाला यांच्या पाठीशी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम सह मतदारांचे आशिर्वाद असल्याने जलील लाला सहाव्यांदा नगर पालिकेच्या सभागृहात नगरसेवक म्हणुन या प्रभागाचे सर्व कामे करण्यासाठी जाणार आहेत. येणाऱ्या २ तारखेला तुतारी या चिन्हासमोरील बटण दाबुन जलील खान पठाण उर्फ जलील लाला यांच्या चिन्हासमोरील बटण दाबून त्यांना सहाव्यांना नगरपालिकेत नगरसेवक म्हणुन पाठविण्याचा ठाम निर्णय मतदारांनी घेतला आहे.

कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. वर्षानुवर्षे समाजकार्यातून घडलेली त्यांची प्रतिमा व सर्वसमावेशक भूमिका त्यांच्या पाठिशी मोठा जनसमुदाय उभा करीत आहे.

महेश धांडे यांनी प्रभागातील प्रत्येक जाती-धर्मातील लोकांशी सातत्याने जपलेले मैत्रीपूर्ण संबंध, नागरिकांच्या सुखदु:खात नेहमी अग्रेसर राहण्याची त्यांची कार्यशैली आणि जमिनीवर उतरून केलेले काम यामुळे प्रभाग १७ मध्ये त्यांच्याबद्दल आदर व विशास वाढत चालला आहे. विशेषतः तरुण मतदार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यात धांडे यांच्याबद्दल उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. निवडणुकीची तारीख जवळ येत असताना प्रभाग १७ मधील वातावरण दिवसेंदिवस रंगतदार होत असून महेश धांडे यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागात चुरस अधिक वाढल्याचे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे. त्यांच्या जनसेवेच्या निर्धारामुळे आणि विकासाभिमुख धोरणामुळे प्रभागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर त्यांच्या पाठीशी उभे राहतील, असा अंदाज राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.

# शिरूर, दिंद्रुडमध्ये वाळूमाफिया विरोधात पोलिसांची मोहीम

बीड, (दिव्य न्युज):- अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोहीम सुरु केली आहे. यामध्ये दिंद्रुडमध्ये दोन ठिकाणी कारवाई करत वाळू व दोन वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर शिरुर पोलिसांनीही कारवाई करत ट्रॅक्टरसह वाळू असा मुद्देमाल जप्त केला.

मंगळवारी दिंद्रुड पोलीस स्टेशन हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात करण्यात आलेल्या सलग कारवाईत दोन वाहने आणि अडीच ब्रास वाळू असा एकूण १२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही घटनांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

दिंद्रुड जवळ आनंदगाव-लोनगाव रोडवर पांढऱ्या रंगाच्या क्रमांक नसलेल्या पिकअप वाहनाची तपासणी करण्यात आली. त्यात जितीन राजेभाऊ पौळ (वय ३२, रा. खरात आडगाव) हा अवैधरित्या एक ब्रास वाळू वाहतूक करताना आढळून आला. पोलीसांनी त्याच्या ताब्यातील पिकअप वाहन जप्त केला. या प्रकरणी दिंद्रुड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यानंतर केवळ एक तासातच, रात्री १० वाजता लोनगाव चौकाजवळ तपासणीदरम्यान आणखी एक वाहन जप्त करण्यात आले. जीवन काशिनाथ साळवे हा टेम्पोमधून दीड ब्रास वाळू विनापरवाना वाहतूक करताना सापडला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

प्रत्यक्ष कारवाईत सपोनि, महादेव ढाकणे, पोउपनि, पवनसिंग जंघाळे, भराडे, सचिन गायकवाड यांनी सहभाग नोंदवला. तर शिरुर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सिंदफणा नदीपात्रातून अनधिकृतपणे वाळू वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत एकूण ८ लाख ८ हजार किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून आर ोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी सकाळी पोलीस हवालदार तुषार गायकवाड आणि पोलीस अंमलदार सुनील बहिरवाळ हे बीटमध्ये पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की माळेवाडी शिवारातील सिंदफणा नदीपात्रात एक ट्रॅक्टर अनधिकृतपणे वाळू घेऊन जात आहे.त्यानुसार पथकाने तत्काळ घटनास्थळी छापा टाकला असता, तेथे हिरव्या रंगाचा जॉन डीअर ट्रॅक्टर वाळूने भरलेला अवस्थेत मिळून आला. तपासात सदर ट्रॅक्टर चालक हनुमंत रामभाऊ काशीद हा वाळू विनापरवाना वाहतूक करत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी शिरूर कासार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.शिरूर कासार पोलिसांनी वेळेवर केलेल्या या कारवाईमुळे परिसरात वाढत चाललेल्या अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईमुळे अशा बेकायदेशीर कामांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत झाली आहे.गेवराई पोलिसांच्या पथकाने गोदावरी काठावर अवैधरित्या वाळु घेवून जाणाऱ्या ट्रकवर कारवाई केली. यामध्ये जुन्या नागझरी परिसरात एका ट्रकमध्ये अवैधरित्या उपसा केलेली वाळू भरली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार त्या ठिकाणी पोलिस दाखल होतास सुनील माळी नावाचा व्यक्ती ट्रॅक्टर व लोडर घेवून पसार झाला तर मनोज जोगदंड याच्या ताब्यातून एक ट्रक जप्त करण्यात आला. या प्रकरणात गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान ४ वरून

## निवडणुकीमध्ये कायदेशीर

अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये योगेश क्षीरसागरांनी आपल्याला डावलले जात असल्याचा भावना व्यक्त करत ऐन उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दोन दिवस अगोदर पक्षाच्या पदाचा राजीनामा दिला आणि थेट पंकजाताईंच्या माध्यमातून संभाजीनगर येथे जाऊन भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. बीड शहरामध्ये भारतीय जनता पक्षाला ऐनवेळी योगेश क्षीरसागरांच्या रुपाने मोठे बळ मिळाले. भाजप आणि योगेश क्षीरसागर यांनी दोघांनी चर्चा करत ऐनवेळी उमेदवार घोषीत केले तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व बीड नगर पालिकेपुरते विजयसिंह पंडित यांच्याकडे देण्यात आले.

## साडे तीन लाख रुपयाचा

३,५०,०००/-चा (तीन लाख पन्नास हजार रुपये) दिनांक २४-०८-२०२३ रोजीचा धनादेश फिर्यादीस दिला सदरील धनादेश तुम्ही वटनावळीस टाका आपणांस आपली रक्कम मिळून जाईल अशी खात्री आरोपीने फिर्यादीस दिली. आरोपीच्या शब्दावर विश्वास ठेवून फिर्यादीने सदरली धनादेश बँक ऑफ महाराष्ट्र शाखा येळंबघाट ता. जि. बीड. या बँकेत दाखल केला असता सदरील धनादेश न वाटता रेफर टू ड्रॉवर या शेऱ्यासह दिनांक २५-०८-०२३ रोजीच्या शेऱ्यासह परत आला. आरोपीच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नाही हे माहिती असूनही आरोपीने फिर्यादीस वरील रकमेचा धनादेश देऊन आरोपीने जाणेपूर्वक फिर्यादीस फसवले. आरोपीने दिलेला धनादेश हा अनादरीत होऊन परत आल्या बाबत फिर्यादीने आरोपीस कळवले असता त्या साफ दुर्लक्ष केले त्यानंतर फिर्यादीने आरोपीस धनादेश न वठल्यामुळे दिनांक ०६-०९-२०२३ रोजी वकिलामार्फत सदरच्या धनादेशांमधील रक्कम मागणीची नोटीस आरोपीच्या अचूक पत्त्यावर पाठवली सदरची नोटीस आरोपीस दिनांक १३- सप्टेंबर २०२३ रोजी मिळालीसदर सदर नोटीस मिळून देखील आरोपीने मुदतीत रक्कम फिर्यादीस परत केलेली नाही.

त्यामुळे फिर्यादीने मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड येथे कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट क्ट अन्वये तक्रार दाखल केली. सदर फिर्याद दाखल केल्यानंतर सदर प्रकरन एस.एस.सी. १६०९/२०२३ नोंदवले गेले. सदर प्रकरणात फिर्यादीतर्फे फिर्यादी रविंद्र भिंताडे यांची साक्ष नोंदवण्यात आली व अभिलेखावर मूळ धनादेश, धनादेश, न वाटता परत आल्याचा मेमो, नोटीस, नोटीस आर पी ए डी पावती, नोटीस पोचपावती इत्यादी कागदपत्रे दाखल केले सदर कागदपत्र दाखल केले त्यानंतर आरोपीतर्फे आरोपी स्वतः आश्रुबा तांदळे यांची साक्ष नोंदवण्यात आली व इतर एक साक्षीदार नामे रावसाहेब कोंडीबा तांदळे यांची साक्ष आरोपीतर्फे नोंदवण्यात आली. सदर व्यवहार हा बिशीचा असल्याबाबत बचाव आरोपीने घेतला. साक्षी पुरावा संपल्या नंतर सदर प्रकरण अंतिम युक्तीवादा करिता नेमण्यात आले. युक्तिवादअंती फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन करून माननीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड. यांनी सर्व साक्षी पुराव्यांचे अवलोकन अवलोकन व फिर्यादीचे विधिज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य करून मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब यांनी आरोपीस सहा महिने शिक्षा व धनादेश रक्कम व दंड मिळून अशी एकूण चार लाख सत्तर हजार रुपये रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेश केले. सदर प्रकरणात फिर्यादी तर्फे ड. सागर नाईकवाडे, ड. नवनाथ शिंदे यांनी काम पाहिले त्यांना ड. सुधीर जाधव, ड. सतीष गाडे, ड. राजेश जाधव, ड. विवेक डोके ड. कृष्णा आवारे, आकाश गायकवाड यांनीसहकार्यकेले.

## आम आदमी पार्टी

पार्टीच्या उमेदवारांना लालच, दबाव व दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु आम आदमी पार्टीचा एकही कार्यकर्ता वा उमेदवार दबावाला बळी पडणार नाही. कारण आम आदमी पार्टीची ताकद म्हणजे जनतेचा विश्वास व प्रामाणिक लढा. सत्तेच्या लालसेपोटी सुरू असलेल्या राजकीय डावपेचांपुढे आमचे उमेदवार खंबीरपणे उभे आहेत. जनतेसमोर दिलेल्या पर्यायामुळे प्रस्थापितांची झोप उडाली आहे. नागरिकांनी दिलेल्या पाठिंब्यावर आम आदमी पार्टी पूर्णपणे सक्षम आहे. बीड शहरातील प्रत्येक मतदारामध्ये आज बदलाची तीव्र इच्छा आहे, आणि आम आदमी पार्टी हा बदल आणणार आहे.

# बंडखोरांना थंड करण्यासाठी नेत्यांची कसोटी; गुरुवारची रात्र गुप्त बैठका अन् मनधरणीची!


## युती-आघाडीतील स्थानिक नेत्यांच्या समर्थकांनीच भरले अपक्ष अर्ज; उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्यासाठीची वेळ

### तिकीट नाकारल्याने अनेकांची बंडखोरी

१.ज्यांना तिकीट नाकारले, त्यांचा हिरमोड झाला आहे. त्यांची नाराजी दूर करण्यासाठी नेत्यांकडून अर्ज माघारीसाठी मनधरणी केली जाण्याची शक्यता आहे. २.काही नेत्यांबाबत उघडपणे बैठका घेणे शक्य नसल्याने, रात्रीतून घरी जाऊन गुप्त बैठकांचे सत्र सुरू होईल. ३.या बैठकांमध्ये बंडखोरांना भविष्यात पदे देण्याचे किंवा इतर मार्गांनी त्यांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन देऊन मन वळवण्याचा प्रयत्न केला जाईल. ४.२१ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंत किती उमेदवार माघार घेतात, यावरच बीड पालिका निवडणुकीच्या लढतींचे अंतिम स्वरूप स्पष्ट होईल.

### भाजपमध्ये निष्ठावंतांचे तिकीट कापले ?

दुसरीकडे, अजित पवार गटाला सोडचिठ्ठी देत डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजपात प्रवेश केला. भाजपला नक्कीच बळ मिळाले असले तरी, क्षीरसागर समर्थक आणि भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये आता उमेदवारीवरून नाराजीचे सूर उमटत आहेत. भाजप विद्यार्थी आघाडीचे संदीप उबाळे यांनी डॉ. सारिका क्षीरसागर यांची पोस्ट शेअर करत, प्रामाणिक माणसाचं तिकीट कापल्याचे लिहिले आहे. 'आयात' उमेदवारांसाठी निष्ठावंतांना बाजूला सारले जात असल्याच्या चर्चांमुळे भाजपमध्येही अनेक ठिकाणी बंडखोरी उभी राहिली आहे.




बीड । दिव्य न्युज

जिल्ह्यातील सर्वच नगर पालिकांमध्ये यावेळी चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी कार्यरत असली तरी स्थानिक पातळीवर मात्र, उमेदवारी वाटपातील अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर आली आहे. पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने अनेक इच्छुकांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आता या सर्व बंडखोरांना थंड करून अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा करण्यासाठी त्या-त्या पक्षाच्या नेत्यांची मोठी दमछाक होणार आहे. अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत जवळ आल्यामुळे, त्यांच्याकडे अवघे काही तास उरले आहेत.

बीड, धारूर, अंबाजोगाई, परळी, माजलगाव आणि गेवराई या सहा नगर पालिकांसाठी निवडणुका होत आहेत. १० ते १७ नोव्हेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ होती. या दरम्यान उमेदवार निश्चित करताना अनेक राजकीय घडामोडी झाल्या आणि काही ठिकाणी रात्रीतून उमेदवार बदलण्यात आले. १८ नोव्हेंबर रोजी अर्ज छाननी प्रक्रिया पूर्ण झाली, यात अनेकांचे अर्ज वेगवेगळ्या कारणांनी अवैध ठरविण्यात आले. आता २१ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ अर्ज मागे घेण्याची आहे. त्यामुळे पुढील काही तास नेत्यांसाठी अत्यंत आव्हान देणारे आहेत. अपक्ष आणि बंडखोरांमुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला पराभवाचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती नेत्यांना आहे. म्हणूनच, या सर्वांना माघार घेण्यासाठी मनधरणी केली जाण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने सध्या सर्वच नगर पालिकांमध्ये वॉर्डनिहाय गणिते जुळविली जात असून, मतांची गोळाबेरीज करून विजयाची रणनीती आखली जात आहे.




ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख राजू महुवाले यांची सोशल मिडीयावरील पोस्ट.

### आघाडीत गटबाजी, उपजिल्हाप्रमुखाला एबी फॉर्म नाही

बीडमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट आघाडी करून लढत आहेत. मात्र, या आघाडीतील अंतर्गत गटबाजी उघड झाली आहे.

नगरसेवकपदासाठी शिवसेना ठाकरे गटाच्या उपजिल्हाप्रमुखाला पक्षाने 'एबी फॉर्म'च दिला नाही.

त्यामुळे त्यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त करत सोशल मीडियावर पोस्ट केली आणि राजू महुवाले यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

या प्रकारामुळे आघाडीतील गटबाजी चव्हाट्यावर आली आहे.

---

## पैठणमध्ये भाजपला फूट पडण्याची शक्यता

पैठण । दिव्य न्युज

सध्या नगरपरिषद च्या निवडणुकीचा काळ असल्यामुळे निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. परंतु पैठण नगर परिषदेच्या निवडणुकीच्या काळामध्ये सध्या फॉर्म भरणे झालेलेआहे. पैठण मध्ये भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून नवीन चेहरे पुढे आणण्याची ठरलंय असे चित्र दिसत आहे. यामध्ये भाजपचे निष्ठावंत कार्यकर्त्यांची बैठक होऊन सुद्धा भाजप पक्षात पैठणमध्ये पैठणमध्ये घराणेशाही चालवली जात आहे असे चित्र समोर दिसून येत आहे.



पक्षाच्या जिल्हाअध्यक्ष यांनी पैठण मध्ये एकाच व्यक्तीच्या हातात सर्व कारभार दिला. आणि तो व्यक्ती आपल्या मनपसंतीच्या आपल्या मर्जीच्या आणि आपल्या जवळच्या नातेवाईकांचे हिताचे काम करताना दिसत आहे. जुने निष्ठावंत कार्यकर्ते असतानाही सुद्धा नवीन चेहरे समोर आणलेले आहेत अशामुळे जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे त्यांनी भाजपला सोडचिट्टी देण्याचा पवित्र घेतलेला आहे. नगरपरिषद पैठण येथे नगराध्यक्षपदी ओपन महिला असताना आपल्या पत्नीला पुन्हा उमेदवारी मिळवून घेतली स्वतःची पत्नी कधीही आमच्या व भाजपच्या मिटींगला उपस्थित नसतात तरीही त्यांना तिकीट देण्यात आली हा आमचा निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अपमान आहे असं नाही वाटत का आम्ही भाजपचे सक्रिय कार्यकर्ते असून भाजपच्या जुन्या पदाधिकारी महिलांनी तिकिटाची मागणी केली होती. परंतु तालुक्यातील भाजप पक्ष फक्त एकाच व्यक्तीच्या ताब्यात कसा देण्यात आला अशी चर्चा सध्या होत आहे. ह्या प्रकारामुळे निष्ठावंत व जुने कार्यकर्ते यांचे तिकीट डावलण्यात आल्यामुळे त्यांनी भाजपच्या राजीनाम्याचा पवित्रा घेतला आहे.पैठण भाजपच्या जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी यांचा जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी राजी नाम्याची तयारी केली आहे असे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते विजय ठाणगे यांनी दैनिक दिव्य वार्ता ला बोलताना प्रतिक्रिया दिली. यामध्ये निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे सुरज घुले. सौ नम्रता पटेल. शिवाजीराव तुपे.विजय ठाणगे. अमोल कुंडारे. दीपक लखमले.महादेव बटुळे व अश्विनी लखमले उपजिल्हाध्यक्ष ओबीसी मोर्चा अशा सर्व भाजपच्या जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी राजीनामा देण्याचे ठरविले आहे. तरी आता पैठण नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये विविध ठिकाणातून विविध पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज भरलेले आहेत. बऱ्याच ठिकाणी महिलांसाठी राखीव जागा असल्यामुळे पैठण शहरांमध्ये महिलाराज येणार यात शंका नाही परंतु विविध पक्षांच्या मोर्चा बांधणीतून नेमका कोणत्या पक्षाचा नगरपरिषदवर झेंडा फडकतो हे येणाऱ्या काळात कळेल.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे विद्यापीठ मैदानी स्पर्धेत घवघवीत यश



बीड । दिव्य न्युज

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पी. ई. एस. शारीरिक शिक्षण महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन मैदानी सेंट्रल झोन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या खेळाडूनी घवघवीत यश संपादन केले आहे. चि. कृष्णा प्रकाश मोरे यांनी २० किलोमीटर चालणे या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. आदित्य धनराज लांब याने २० किलोमीटर चालणे या क्रिडा प्रकारामध्ये तृतीय क्रमांक पटकावलेला आहे. तसेच कु. पूर्वा आत्माराम साळुंके हिने २० किलोमीटर क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कु. पूर्वा आत्माराम साळुंखे, कु. दिव्या अर्जुन कदम कु. दिलशाद माजेद पठाण व कु. नंदिनी शरद जोगदंड या मुलींच्या ४द१०० मीटर रिले संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. विजयी खेळाडूंना प्रा. डॉ. भारत पल्लेवाड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. विजयी खेळाडूंचे अभिनंदन आणि कौतुक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे व कनिष्ठ विभाग उपप्राचार्य प्रा. प्रताप जाधव, प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे, प्रा. डॉ. अनंत मरकाळे, प्रा. डॉ. मुंडे तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रमुख कार्यकर्त्यांची महाबैठक भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे काका यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

### कार्यकर्त्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थे च्या निवडणुकीसाठी सज्ज रहावे -मा.आ.भिमराव धोंडे, बाळासाहेब आजबे यांचे आवाहन



पाटोदा / दिव्य न्युज

चुबळी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पाटोदा तालुका प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक सपन्न झाली या बैठकीस तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते, या प्रसंगी माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी भीमराव धोंडे साहेब म्हणाले कि आपण सर्वजण एकदिलाने आगामी काळात काम करून पार्टी मजबूत करू आणि स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेऊ, या प्रसंगी माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी सांगीतलें कि मागील काळात अनेक विकास कामे मा पालकमंत्री अजित दादा पवार साहेब यांच्या माध्यमातून मतदार संघात खेचून आणले, मतदार संघाचा विकास केला आगामी काळात सुद्धा आपण त्याच पद्धतीने मतदारसंघाच्या विकासासाठी काटी बद्ध आहोत या प्रसंगी कार्यकर्त्यांनी जनतेच्या कामासाठी नेहमी रस्त्यावर राहिले पाहिजे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक ता अध्यक्ष दिपक दादा घुमरे यांनी केले या प्रसंगी ते म्हणाले कि धोंडे साहेब आणि आजबे काका हे दोघे ही प्रामाणिक व्यक्ती असून कसलेही गालबोट त्यांना लागले नाही कार्यकर्त्यांनी खम्बिर पणे आगामी निवडणुकीच्या कामाला लागावे या प्रसंगी जेष्ठ नेते अप्पासाहेब राख,भाऊसाहेब भराटे, पांडुरंग नागरगोजे,अंगद भोंडवे, रेशमाताई पवळ,रुपेश राजे बेद्रे, डॉ कवठेकर,राजपाल शेंडगे, बाळासाहेब पवार,प्रवीण सानप, सुरेश राख, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी जेष्ठ नेते गुलाबराव घुमरे, माजी प स सदस्य गौतम सरवदे, नवनाथ सानप, रामदास गिते, डिगंबर नाईकनवरे, अंकुशराव मुंडे,शाम हुले,बाबुराव सोंडगे, अण्णासाहेब लवांडे पाटील,गणेश मोहळकर, केदार शेंडकर, आनंद घुमरे,महादेव चव्हाण, मधुकर येवले,काचरु काळे, अजय गर्जे, झूनगुरे संतोष पाटील, राजाभाऊ काकडे, अशोक बांगर संजय सानप,सलीम चाऊस,अशोक दहिफळे,सेवा सोसायटी सदस्य सुभाष अप्पा घुमरे, तुषार भोसले, आबासाहेब भोसले,बाबासाहेब तनपुरे,संजय गायकवाड, भाऊसाहेब येवले, गणेश अंदुरे, माजी सांभा पती अनिल जायभाय, गिन्यादेव जाधवर, शिवाजी गर्जे, रामचंद्र मकाळ, अनिल दगडखेर, भागवान शिंदे, गिरे रवींद्र, अरुण येवले, अफसर सयायद,बन्सी खाडे, पोपट सुसलादे, लाला भोंडवे, अविनाश मुंडे, अभिजित मुंडे, माऊली सोनसले, शिवाजी मुळीक, राघू पन्हाळकर,, किसन गुजर, दादा पवार,शरद गावळी, संजय पवार, अण्णा शिंदे,विठ्ठल तांबे, शरद पवार,अजय गर्जे, डॉ मिसाळ अनिल, माजी सरपंच गोंदकर, सकुंडे राजेंद्र, संजयघोषिर, ज्ञानेश्वर पाचपुते,केदार येवले, नानासाहेब पवळ,अभिजीत घुमरे उंब्रविहिरा आदी कार्यकर्ते हजर होते.

---

## शेतकऱ्याच्या पांढऱ्या सोन्याला कवडीमोल भाव; सोयाबीनही दरात रुसले !

### उत्पादन खर्चही निघणे मुश्किल



वडवणी । दिव्य न्युज
(शेख शरीफ)

अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे बंदाचे खरीप हंगाम हाती गेल्यानंतर आता शेतकऱ्याच्या हाती आलेल्या नगदी पिकांवर बाजारातील धोरणांचे दुहेरी संकट कोसळले आहे. 'पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाला खासगी व्यापारी अत्यंत कवडीमोल भावाने खरेदी करत असल्याने आणि सोयाबीनलाही हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने वडवणी तालुक्यातील शेतकरी पूर्णपणे विवंचनेत सापडला आहे.

वडवणी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने, सोयाबीन, कापूस, तुर आदी पिके घेतात, मात्र, यावर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात नष्ट झाले. जे थोडेफार उत्पादन हाती आले, त्यालाही ३,३०० ते ४.२०० रुपये प्रति विंटल असा अत्यंत कमी भाष मिळत आहे हा भाव हमीभावापेक्षाही कमी आहे आणि दसरा-दिवाळीपासून त्यात कोणतीही वाढ झालेली नाही, दुसरीकडे, शेतकऱ्यांची सारी भित असलेल्या कापसाला सध्या ५,००० से ५,८०० रुपये प्रति किंटल असा दर दिला जात आहे.

शेतक-यांचे म्हणणे: मागील काही वर्षांत कापसाचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. केवळ बेचणीसाठीच प्रति किलो १० ते १२ रुपये खर्च येत आहे. अशा परिस्थितीत ७,००० रुपयांपेक्षा कमी दराने कापूस विकणे शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे परवडणारे नाही. व्यापाऱ्यांकडून दर पाढण्याचे कारण; 'ओलावा आणि 'पत'! विशेष म्हणजे, शेतकरी रात्रंदिवस शेतीत कबडकष्ट करून, रोगापासून वाचवून कापूस पिकवतो आणि विक्रीच्या वेळी मात्र दराचे 'भाव' कोसळतात, हा अनेक वर्षांचा अनुभव आहे. यावर्षी खासगी व्यापारी कापसातील ओलावा आणि कापसाची पत हे कारण सांगून दर पाडत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या कडचे 'पांढरे सोने' अक्षरशः मातीमोल भावाने जात आहे. या दुहेरी संकटामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. ❋ उत्पन्न कमी: खर्च जास्त आणि उत्पन्न कमी असल्याने सोयाबीन परवडले नाही, आता कापसाचेही दर कमी झाले आहेत. ❋ कर्जाची चिंता: कुटुबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, तसेच बी-बियाणे आणि लागवडीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, या विचचनेत बळीराजा अडकला आहे.

❋ हताश: या प्रचंड आर्थिक नुकसानीमुळे बळीराजा पूर्णपणे हतबल झाला असून, त्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे.

नगदी पिकांचे दर कोसळल्याने आता शेतकऱ्यांनी आपले लक्ष तुरीच्या पिकाकडे वळवले आहे. सध्या तुरीचे पीक जोमात बहरले आहे यातून तरी काहीतरी हाती पडेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. मात्र, सध्याचे ढगाळ बातावरण बहरलेल्या तुरीला फटका देऊ नये, अशी चिंताही शेतकऱ्यांमध्ये आहे.

प्रशासनाला आवाहन: शेतकऱ्यांचे नगदी पीक असलेल्या कापसाला योग्य आणि किमान उत्पादन खर्च अधिकचा भाव मिळण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करून खरेदीचे नियोजन करावे, अशी मागणी आता शेतकरी करत आहेत.

## उपळीमध्ये ऑल इंडिया पँथर सेनेतर्फे टिपू सुलतान जयंती उत्साहात साजरी



वडवणी । दिव्य न्युज

वडवणी तालुक्यातील उपळी येथे स्वातंत्र्याचा ध्वज फडकवणारे शौर्यसम्राट टिपू सुलतान यांची २७५ वी जयंती मोठ्या थाटामाटात व उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील नागरिकांची उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी टिपू सुलतान चौकात सरपंच व उपसरपंच यांच्या हस्ते ध्वजावंदन करण्यात आले आणि सरपंच उपसरपंच यांना ग्रामपंचायत कार्यालयात लावण्यासाठी टिपू सुलतान या महापुरुषाच्या फोटो सप्रेम भेट दिला. यावेळी उपळी गावचे सरपंच सचिन हळकर, उपसरपंच विनायक शेळके,ग्रामपंचायत सदस्य तय्यब पटेल, टिपू सुलतान युमा मंच तालुकाध्यक्ष एजाज शेख, उपाध्यक्ष हकीम शेख, ऑल इंडिया पँथर्स सेनेचे वडवणी तालुका अध्यक्ष त्रिंबक पायके हफीज फारुख, शेख रियाज बिग, गौतम सौंदरमल, महादू इचके, तानाजी भाऊ सोनवणे, राजू भैय्या शेख, जावेद शेख, बबलू शिंदे, रिजवान शेख-यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग घेत कार्यक्रमाला उपस्थिती लावली. या प्रसंगी टिपू सुलतान यांच्या अद्वितीय पराक्रमाचे, बलिदानाचे आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाचे स्मरण करून सर्वांनी त्यांना अभिवादन केले. गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी व भव्यदिव्य झाला.

## शेतकऱ्याच्या सोलार पॅनल चे मुसळधार पाऊस वाऱ्याने नुकसान

शहाजनपूर । दिव्य न्युज

गेवराई तालुक्यातील शहाजनपूर (चकला) येथील शेतकरी रोहिदास जयराम बंगाळ यांच्या गट क्रमांक ६१, अनकोटा येथील विहिरीवर बसवण्यात आलेल्या एछ खलेप कंपनीच्या सोलार पॅनलला अतिवृष्टीसह आलेल्या जोरदार वादळवाऱ्याचा मोठा फटका बसला आहे.

मागील काळात मुसळधार पावसात अचानक आलेल्या तीव्र वाऱ्याने विहिरीवर बसवलेल्या सोलार पॅनलच्या पाट्या पूर्णपणे फुटून नुकसानग्रस्त झाल्या आहेत. पॅनलची रचना ढासळल्याने शेतातील पाण्याची व्यवस्था कोलमडली असून सिंचन पूर्णपणे बंद पडले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शेतकरी रोहिदास बंगाळ यांनी संबंधित यंत्रणा व कंपनीने तातडीने पाहणी करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. स्थानिक शेतकऱ्यांमध्येही अशा घटनांमुळे चिंता व्यक्त होत आहे. प्राकृतिक संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार व संबंधित कंपनीने उभे राहावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# निवडणुकीमध्ये कायदेशीर आणि तांत्रिक बाबी या किती महत्वाच्या असतात याचा प्रत्यय बीडमध्ये संदिप क्षीरसागरांनी केलेल्या खेळावरुन दिसून आला

## संदिप क्षीरसागर हे पक्षाचे सर्वेसर्वा असल्यामुळे त्यांनी २६ प्रभागातील ५२ नगरसेवकांचे शांततेत नियोजन लावले, दुसऱ्याकडे मात्र गटबाजीमुळे शेवटच्या दिवसापर्यंत लाथाळ्या चालू होत्या







बीड । दिव्य न्युज

निवडणुकीमध्ये कायदेशीर आणि तांत्रिक बाबी या किती महत्वाच्या असतात याचा प्रत्यय बीडमध्ये संदीप क्षीरसागरांनी केलेल्या खेळीवरुन दिसून आला. नगराध्यक्ष पदाचा उमेदवारीचा अर्ज वेळ संपण्याच्या अर्धा तास अगोदर शरद पवारांच्या तुतारीच्या सौ. स्मिता वाघमारे यांनी दाखल केला. दुसऱ्या पक्षाकडून कोण उमेदवार येत आहे याची वाट पाहिली आणि मग आपला उमेदवार उतरविला. तसेच नगर सेवकांचे अर्ज भरत असतांना कोणाला उमेदवारी द्यायची याबद्दल गुप्तता पाळली. एका एका वार्डात तीन तीन जणांना अर्ज भरायला लावले, परंतु ज्याला उमेदवारी द्यायची त्याच्या अर्जाला एबी फॉर्म जोडला. यामुळे विरोधकही अनेक वार्डामध्ये अचंबीत झाले. बीड नगर पालिका निवडणुकीत संदीप क्षीरसागर यांच्या पक्षाचे तेच सर्वेसर्वा असल्यामुळे त्यांनी २६ प्रभागातील ५२ नगर सेवकांचे शांततेत नियोजन लावले. दुसरीकडे मात्र गटबाजीमुळे शेवटच्या दिवसापर्यंत लाथाळ्या चालू होत्या.बीड नगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्यात तरी आ. संदीप क्षीरसागर हे यशस्वी झाल्याचे चित्र आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा दिवस जवळ आला तरी भाजप आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीमध्ये गटबाजीचे ग्रहण लागले होते. ►► पान २ वर

### आ.संदीप क्षीरसागरांची नियोजनपुर्वक तयारी

भाजप आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीमध्ये उमेदवारी जाहीर करतांना खूप ओढाताण झाली. परंतु दुसरीकडे संदीप क्षीरसागरांचे नियोजन हे शांतपणे चालू होते. कुठलीही घाईगडबड न करता प्रत्येक वार्डात कसे समीकरण आहे, कोणता उमेदवार प्रभावी राहील याचा पूर्ण अभ्यास करत त्यांनी उमेदवार हेरले. प्रत्येक वार्डातून इच्छुक असणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या मुलाखतीतून डाटा तयार झाला. त्यात कोणते उमेदवार विरोधकांकडून येऊ शकतात आणि त्याला तुल्यबळ लढत देणारे आपले उमेदवार कसे असावेत याचाही अंदाज घेत उमेदवार निवडले गेले. उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत कोण उमेदवार आहे हे थेटपणे जाहीर केले नाही. ज्याला उमेदवारी द्यायची आहे त्याच्या अर्जाला शेवटच्या काही तासात पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म जोडला, त्यामुळे तो एकमेव उमेदवार अधिकृत झाला. बाकी इच्छुकांनी भरलेले अर्ज आपोआप उडाले.

### नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठीही सावधगिरी

नगराध्यक्ष पदासाठी सुद्धा संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अनेकांची नावे चर्चेत होती परंतु भाजप आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीकडून कोण निवडणूक रिंगणात येत आहे याची पूर्ण वाट पहात या दोन्ही पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारी अर्ज भरल्यानंतर मग अर्ज दाखल करायला शेवटचा अर्धा तास बाकी असतांना संदीप क्षीरसागर यांनी सौ. स्मिता विष्णू वाघमारे यांना उमेदवारी अर्ज भरायला सांगितले. या सर्व खेळीमध्ये संयम आणि शांत राहून अभ्यासपूर्ण नियोजन करत आणि कायदेशीर चाली खेळत त्यांनी पहिल्या टप्प्यात तरी बाजी मारली असल्याचे चित्र आहे.

# साडे तीन लाख रुपयाचा धनादेश वटला नाही म्हणून आरोपी आश्रुबा बाबासाहेब तांदळे यास सहा महिने शिक्षा व धनादेश रक्कम सह एक लाख वीस हजार रुपयाचा दंड

बीड । दिव्य न्युज

फिर्यादीची फिर्याद थोडक्यात अशी की, फिर्यादी नामें रविंद्र गोरख भिंताडे राहणार पांढऱ्याची वाडी ता. जि. बीड येथील रहिवासी असून आरोपी हा तांदळ्याचीवाडी पोस्ट चाकरवाडी ता. जि. बीड. येथील रहिवासी आहे.फिर्यादीचे व आरोपीचे गाव जवळ जवळ असल्यामुळे फिर्यादी व आरोपीमध्ये मागील वीस वर्षापासून सलोख्याचे विश्वासाचे व मित्रत्वाचे तसेच घरगुती संबंध होते. फिर्यादी व आरोपीमध्ये मागील दहा ते पंधरा वर्षांपासून एकमेकांच्या व्यवसायिक व घरगुती अडचणी निवारण्या करिता



रक्कम देण्या-घेण्याचा व्यवहार होत होता. आरोपीने माहे मे २०२३ मध्ये त्याचे व्यावसायिक व घरगुती प्रापंचिक अडचण निवारण्या करता रक्कम रुपये ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार) रुपयांचे आवश्यकता होती. त्यामुळे आरोपीने सदर रकमेची फिर्यादीस मागणी केली व सदर रक्कम आरोपीने फिर्यादीस तीन महिन्यात देण्याचे कबूल केले.आरोपीचे फिर्यादी सोबत केलेले पूर्वीचे व्यवहार व सर्व पारदर्शक पणे पूर्ण झाल्यामुळे फिर्यादीने त्याच्याकडे शिल्लक असलेली रक्कम रुपये ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार रुपये) आरोपीस देण्यास फिर्यादी तयार झाला. त्याप्रमाणे फिर्यादीने आरोपीस रक्कम रुपये ३,५०,०००,/- (तीन लाख पन्नास हजार रुपये) हात उसने म्हणून मे २०२३ मध्ये आरोपीस दिले. आरोपीने सदर रक्कम तीन महिन्यात परत करण्याचे आश्वासित केले. मुदत संपल्यानंतर फिर्यादीने आरोपीस हात उसने दिलेल्या रकमेची मागणी केली परंतु आरोपीने त्याची वैयक्तिक अडचण सांगून थोडे दिवस थांबा पैशाची व्यवस्था करतो असे म्हणून वेळ मारून नेली. त्यामुळे फिर्यादीने माणुसकीचे नात्याने हा आरोपीस काही दिवस पैशाची मागणी केली नाही. त्यानंतर शेवटी फिर्यादीने ऑगस्ट २०२३ मध्ये आरोपीस हात उसने दिलेल्या रक्कम ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार रुपयाची) मागणी केली असता आरोपीने फिर्यादीचे हक्कात आरोपीचे खाते क्रमांक २०२४९५१३७१५ चा बँक ऑफ महाराष्ट्र शाखा येळंबघाट ता. जी बीड धनादेश क्रमांक ०६२४८४ रक्कम रु ►► पान २ वर

# प्रा.सुशीलाताई मोराळे यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा राजीनामा

बीड । दिव्य न्युज



आज दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचा मी प्राथमिक सदस्यत्वाचा आणि महासचिव पदाचा राजीनामा देत आहे. पक्षश्रेष्ठींकडे हा राजीनामा मी पाठवला आहे. माझा राजीनामा मंजूर करून मला पदमुक्त करावे अशी विनंती आपण माननीय अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना केली आहे. पक्षात काम करताना होत असलेली कुचंबना व गळ चेपी तसेच लोकसभेला उमेदवारी नाकारली. विधानसभेलाही उमेदवारी नाकारली. नगरपरिषद बीडच्या निवडणुकीत वार्ड क्रमांक ११ मधून राजेंद्र सानप यांच्या पत्नी मीराताई सानप यांना मी शिफारस करूनही उमेदवारी नाकारली राजेंद्र सानप २६ वर्ष पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. मी जिल्हाध्यक्षांकडे मीराताई सानप यांना महिला ओबीसी प्रवर्गातून उमेदवारी द्या असा आग्रह मी केला परंतु त्यांची उमेदवारी नाकारली एकंदर पक्षात चालू असलेल्या ►► पान २ वर




बीड : प्रभाग क्र.२० मध्ये तुतारीच्या उमेदवारांनी आईचा आर्शिवाद घेवून प्रचाराला सुरूवात प्रभाग क्र.२० मध्ये आ.संदिप क्षीरसागर व मा.आ.सय्यद सलिम यांचे कट्टर समर्थक असलेले शेख सरफराज उर्फ शप्पो दादा यांना (अ) मधून तर शेख रईस यांच्या आई शेख शानुर बी शेख खाजा यांना(ब) मधून उमेदवारी दिली आहे. प्रचाराला सुरूवात करण्यापुर्वी आईची दुआ घेवून प्रचाराला सुरूवात केली. या प्रभागात तुतारीचा जोरदार आवाज राहणार

# आम आदमी पार्टी न.प.निवडणूक रिंगणात उतरल्यामुळे प्रस्थापितांचे दणाणले धाबे-अशोक येडे

बीड । दिव्य न्युज

बीड नगरपरिषद निवडणुकीत आम आदमी पार्टीने स्वबळावर दमदार पणे प्रवेश केला असून नगराध्यक्ष पदासह १६ प्रभागांत उमेदवार निश्चित करण्यात आले आहेत. लोकाभिमुख, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त पर्याय उभा राहिल्याने वर्षानुवर्षे सत्ता भोगणाऱ्या प्रस्थापित गटांचे धाबे दणाणले आहेत. शहरातील मतदारांना खऱ्या अर्थाने विकासाचा, प्रामाणिकतेचा आणि स्वच्छ राजकारणाचा पर्याय मिळत असल्यामुळे काही विरोधक आम आदमी ►► पान २ वर



# राष्ट्रवादी काँग्रेस तुतारीचे जिल्हा उपाध्यक्ष झुंजार धांडेंचा राजीनामा

## संदीप क्षीरसागरांना आमदार करण्यासाठी जिवाचं रान केलं पण कार्यकर्त्यांना वापरायचं, कानफुक्यांचं ऐकायचं हाच त्यांचा फंडा



### उमेदवारी मागितल्याचा आमदारांना राग; पत्रक कोणाला विचारून काढले म्हणून विचारला जाब-धांडे

### गेल्या १८ वर्षांपासून एकनिष्ठ राहिल्याचं हे फळ दिलं का?

### कार्यकर्त्यांची कामे होत नाहीत, माझंच ऐका, मला विचारा अन् मला भाव द्या ही वृत्ती वाढली : आमदारांच्या विरोधात स्वकियांचाच रोष

बीड । दिव्य न्युज

**गेल्या १८ वर्षांपासून एकनिष्ठ राहिलो, प्रत्येक निर्णयात साथ दिली, आमदार करण्यासाठी जिवाचं रान केलं, घर-घर फिरलो, लोकांमध्ये गेलो, विरोधकांचा रोष अंगावर घेतला असे असतांना केवळ शेख मुजीब यांच्या उमेदवार पारवे ताईंना उमेदवारी मागितल्याचे पत्रक का काढले ? पत्रक काढण्याआधी कोणाला विचारले ? असे म्हणून आमदार संदीप क्षीरसागरांनी विचारलेला जाब प्रचंड वेदना देणारा ठरला. ज्यांच्यासाठी आपण एवढं सगळं केलं, तोच नेता आज केवळ एका पत्रकावरून अशा पध्दतीने जाब विचारत असेल तर ही बाब माझ्या स्वाभिमानाला ठेच पोहचवणारी आहे.**

प्रत्येकवेळी माझचं ऐका, मला विचारा, माझ्याशिवाय काहीच करू नका ही वृत्ती वाढत असल्याने मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदासह सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे झुंजार धांडे यांनी स्पष्ट केले आहे. माझ्यासारख्या अशा असंख्य कार्यकर्त्यांची आ.संदीप क्षीरसागर यांच्या पक्षात अशाच पध्दतीने मुस्कटदाबी सुरू असून तोंड दाबून बुक्यांचा मार सहन का करायचा ? असा सवाल उपस्थित करत हा निर्णय घेतल्याचे धांडे यांनी स्पष्ट केले. दरम्यान झुंजार धांडे यांच्या राजीनाम्याने बीड शहरात राष्ट्रवादीच्या तुतारीला मोठा धक्का बसला आहे. बीड विधानसभा मतदार संघाचे आ.संदीप क्षीरसागर यांना आमदार करण्यासाठी निवडणूकीत जिवाचं रान केलं, एक-एक कार्यकर्ता सोबत घेतला आणि त्यांच्या पाठीशी ताकद उभी केली मात्र त्याचं फळ अशा पध्दतीने मिळत असेल तर ही बाब माझ्यासारख्या असंख्य सर्व सामान्य कार्यकर्त्यांना वेदना देणारी आहे. निवडणूका आल्या की कार्यकर्त्यांना विचारायचं, त्यांना वापरायचं आणि काही कानफुक्यांचं ऐकून त्या कार्यकर्त्यांना पुन्हा वाऱ्यावर सोडून द्यायचं हाच आमदारांचा फंडा असल्याचा आरोप झुंजार धांडे यांनी केला आहे. एखाद्या पदाधिकाऱ्याला, कार्यकर्त्याला पत्रक काढून मागणी करण्याचा अधिकार आहे. त्या मागणीवर कशा पध्दतीने विचार करायचा हा त्या त्या पक्षाचा आणि नेत्याचा अधिकार आहे. त्याबाबतचा निर्णय देखील नेत्यांच्या भुमिकेवरच आणि पक्षाच्या विचारावर अवलंबून असतो, मात्र केवळ पत्रक काढून मागणी केली याचा राग काढून जर जाब विचारला जात असेल तर हे त्या नेतृत्वालाही शोभणारं नाही. आमदारांच्या विरोधात स्वकीयांचा मोठा रोष आहे. कार्यकर्त्यांना टाकून बोलणे, चार चौघात अपमान होईल अशा पध्दतीची भाषा वापरणे हे आमदारांना आणि पक्षालाही शोभणारे नाही. त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदासह सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचेझुंजार धांडे यांनी पत्रकात म्हटले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०